JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# “भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ मधील जाहीरनामा आणि केलेल्या वचनपूर्तीचे विश्लेषनात्मक अध्ययन”

**संदीप दासराव धापसे**
पीएच.डी. संशोधक, श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालय,
रावेर, ता.रावेर, जि. जळगांव
मो. ९१५८९५०३८५
ई-मेल : sandeepdhapse@gmail.com

**डॉ. शुभांगी दिनेश राठी**
सेवानिवृत्त प्राध्यापक,
प. क. कोटेचा महिला
महाविद्यालय, भुसावळ, जि-जळगाव

**सारांश :**

भारतात ठराविक कालावधीनंतर संसदेच्या लोकसभा व राज्य विधानसभेच्या निवडणुका या पार पडत असतात. या निवडणुकीत भारतातील राष्ट्रीय, प्रादेशिक व स्वतंत्र पक्ष मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. जनतेला आकर्षित करण्यासाठी विविध राजकीय पक्ष वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरताना दिसतात. बरेच राजकीय पक्ष आपले जाहीरनामे देखील प्रकाशित करतात. सन २०१९ मध्ये पार पडलेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात विविध मुद्द्यांचा अंतर्भाव असलेला दिसून येतो. तसेच त्यांचे बहुतांशी अंमलबजावणी देखील केलेली दिसून येते.

**प्रस्तावना :-**

आपल्या देशात कोणत्याही निवडणुका म्हटलं की विविध राजकीय पक्षांचा मेळावाच भरलेला दिसतो. निवडणुकांमध्ये विविध राजकीय पक्ष आपापल्या कामाला लागलेले आपणास दिसून येतात. निवडणुकीत राजकीय पक्ष खूप मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करतात. तर भारतीय निवडणूक आयोग या सर्व निवडणूक प्रक्रियेवर देखरेख करण्याचे काम करीत असतो. निवडणूक प्रक्रियेचे संपूर्ण आयोजन, नियोजन आणि व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ही भारतीय निवडणूक आयोगाकडे संविधानाद्वारे सोपविण्यात आलेली आहे. एकंदरीत भारतीय निवडणूक आयोगाला कोणतेही निवडणुकीची प्रक्रिया निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पाडणे गरजेचे असते. विविध राजकीय पक्ष जनतेला आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्यासाठी आपला स्वतंत्र असा जाहीरनामा प्रसिद्ध करीत असतात. जाहीरनाम्याच्या माध्यमातून सदर पक्षाने आपली भविष्यकालीन रणनीती ठरविलेली दिसते. जाहीरनाम्याद्वारे राजकीय पक्ष लोकांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करीत असतात. यापैकी बरेच राजकीय पक्ष आपल्या जाहीरनाम्याची तंतोतंत अंमलबजावणी करताना दिसतात तर काही पक्ष फक्त जाहीरनामा प्रकाशित करून जनतेची दिशाभूल करून आकर्षित करण्याचेच काम करताना दिसतात. म्हणून प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये संशोधकाने सन २०१९ मध्ये पार पडलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने आपल्या जाहीरनामाच्या माध्यमातून विविध आश्वासने भारतीय जनतेला दिली होती. यापैकी किती आश्वासने पूर्ण केलेली आहेत, याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन लेखाच्या माध्यमातून घेतलेला आहे.

**भारतीय जनता पार्टी :-**

भारतीय जनता पार्टीचे मूळ हे शामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ मध्ये स्थापन केलेल्या भारतीय जनसंघात दिसून येते. १९७७ मध्ये भारतीय जनसंघात फूट पडून भारतीय जनता पार्टीची स्थापना करण्यात आली. भारतीय निवडणूक आयोगाने भारतीय जनता पार्टीला कमळ

ही निवडणूक चिन्ह म्हणून प्रदान केले. तदनंतर भारतीय जनता पार्टीने हिंदुत्वाचा मुद्दा, राम जन्मभूमी आंदोलन यासारखे महत्त्वाचे मुद्दे नेहमीच आपल्या अजेंडासोबत जोडलेले दिसतात. १९९६ मध्ये संसदेत सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीची निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टीच्या विकासात अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंग, नितीन गडकरी, अमित शहा, जे पी नड्डा हे महत्त्वाचे प्रभावी नेते दिसून येतात. भारतीय जनता पार्टीचे मुख्यालय ०६, दीनदयाल उपाध्याय मार्ग, नवी दिल्ली येथे असून सध्या भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष म्हणून जे. पी. नड्डा हे कार्यरत आहेत. तर पार्टीचे संसदीय पक्ष अध्यक्ष म्हणून नरेंद्र मोदी असून राज्यसभेचे नेते म्हणून पियुष गोयल आहेत. भारतीय जनता पार्टीच्या इतर देखील उपशाखा असलेल्या दिसून येतात.

**सन २०१९ लोकसभा सार्वत्रिक निवडणूक :**

भारतात सन २०१९ मध्ये सतरावी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक ११ एप्रिल ते १९ मे २०१९ या कालावधीत संपूर्ण भारतात एकूण ०७ टप्प्यात पार पडली. २३ मे २०१९ रोजी मतमोजणी जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत विविध राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये प्रामुख्याने भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, द्रविड मुन्नेत्र कळघम, जनता दल, बीएसपी, आम आदमी पार्टी यासारख्या असंख्य राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांनी आपला सहभाग नोंदविला होता. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला २९०+ जागा मिळवण्यात यश मिळाले होते.

**सन २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचा जाहीरनामा :**

सन २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने आपला जाहीरनामा 'संकल्पपत्र लोकसभा २०१९' म्हणून प्रसिद्ध केला होता. या जाहीरनाम्यात भारतीय जनता पार्टीने सर्वप्रथम राष्ट्र, शेती आणि शेतकरी कल्याण, अर्थव्यवस्था, नवीन भारताची सुरुवात, स्वस्थ भारत, सुशासन, युवा भारत, शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण, महिला सशक्तिकरण, सर्व समावेशक विकास, सांस्कृतिक विकास, वैश्विक स्तरावरील भारत अशा विविध मुद्द्यांचा आधार घेत आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यामुळे यातील किती घटकांना भारतीय जनता पार्टीने आपल्या शासन काळात प्राधान्य देऊन त्यांची अंमलबजावणी केली, याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला दिसून येतो.

- **सर्वप्रथम राष्ट्र :** भारतीय जनता पार्टीने आपल्या जाहीरनाम्यात राष्ट्राला सर्वप्रथम प्राधान्य देत भारताला अंतर्गत सुरक्षेसोबतच बहिर्गत सुरक्षेवर भर देण्यात आला होता. यामध्ये आतंकवादावर लक्ष पुरवून सुरक्षा धोरण तयार करणे गरजेचे मानले होते. भारतातील विविध सुरक्षा दलांना अधिक सक्षम व सुदृढ बनवून त्यांचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे मानले. त्याचप्रमाणे भारताचे संरक्षण क्षेत्र देखील आत्मनिर्भर बनवण्यासाठी विशेष पावले उचलले जातील, असे जाहीर केले होते. तसेच सैनिकांचे कल्याण, पोलीस दलाचे आधुनिकीकरण, घुसखोरीची समस्या दूर करणे, भारताची सीमा सुरक्षा सुदृढ करणे, समुद्रकिनाऱ्यावरील तटरक्षक दल सक्षम करणे, नागरिकता संशोधन बिल लागू करणे, जम्मू कश्मीरमध्ये कलम ३७० हटविणे या घटकांना प्राधान्य दिले होते व ते बहुतांशी प्रमाणात लागू करण्यात देखील भारतीय जनता पार्टी यशस्वी झालेली दिसून येते.
- **शेती आणि शेतकरी कल्याण :** याअंतर्गत शेतकरी विकास धोरण आखण्यात प्रामुख्याने भारतातील ०२ हेक्टरपेक्षा कमी शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी योजना लागू करणे, वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या छोटे आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी पेन्शन योजना लागू करणे, कृषीमध्ये ग्रामीण क्षेत्रात २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणे, शेतकऱ्यांना व्याजविरहित किसान क्रेडिट कार्ड वितरित करणे, प्रधानमंत्री फसल बीमा योजना लागू करणे आणि गुणवत्तापूर्ण बीज किफायतशीर दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, कृषी संबंधित क्षेत्रांचा विकास करणे देखील गरजेचे असल्याचे जाहीर केले. संपूर्ण देशभरात वेअरहाऊसचे नेटवर्क तयार करणे, भारतातील विविध प्रलंबित असलेल्या सिंचन योजना पूर्णत्वास नेणे, सहकार क्षेत्राला पुनरुज्जीवन देणे, पशुपालनात क्रांती घडवून आणणे यासारखे मुद्दे समाविष्ट करून ते बहुतांशी प्रत्यक्षात देखील आणलेले दिसून येतात.

- **ग्राम स्वराज्य :** महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य ही मुख्य संकल्पना होती आणि महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त म्हणजेच सन २०२२ पर्यंत जे लोक कच्च्या घरात राहतात, त्यांना योजनेअंतर्गत पक्के घर देणे, जल जीवन मिशन अंतर्गत २०२४ पर्यंत प्रत्येक परिवाराला नळाद्वारे पाणी पुरविणे, देशातील प्रत्येक ग्रामपंचायत २०२२ पर्यंत हाय स्पीड ऑप्टिकल फायबर नेटवर्कने जोडणे, ग्रामीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने शाळा, दवाखाने, बाजार यांना प्रत्येक गावाशी जोडण्यासाठी सडक समृद्धी योजना लागू करणे, स्वच्छतेसंदर्भात योग्य ती पावले उचलणे इ. घटक ग्रामस्वराज्य योजनेत लागू केले होते आणि ते अधिकांश प्रमाणात पूर्ण देखील केले गेल्याचे दिसून येते.
- **अर्थव्यवस्था :** जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था भारताला बनविणे हे भारतीय जनता पार्टीचे मुख्य ध्येय असलेले दिसते. याकरिता संपूर्ण देशात विशेष कर धोरण तयार करणे, वस्तू आणि सेवा कर लागू करणे, भारतीय अर्थव्यवस्थेत १०० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक घडवून आणणे, मेक इन इंडिया अभियान राबविणे, भारताच्या जीडीपीमध्ये खाणकाम क्षेत्राचे योगदान वाढविणे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना विविध योजना लागू करणे, नवीन स्टार्टअप सुरू करणे, क्लस्टर सेवांतर्गत पर्यटन विकास घडवून आणणे, पारदर्शी अर्थव्यवस्था तयार करून आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविणे हे देखील अंतर्भूत होते. यातील बऱ्याच अंशी सुधारणा घडवून आणल्या आहेत.
- **नवीन भारताची सुरुवात :** नवीन भारताची सुरुवात करताना शहरी विकासाला प्राथमिकता देणे, स्वच्छ भारत मिशन राबविणे, जल शक्ती मिशन राबविणे, २०२२ पर्यंत राष्ट्रीय महामार्गांचे अंतर दुपटीने वाढविणे, रेल्वे विकासात संपूर्ण रेल्वेचे विद्युतीकरण करणे, विमानतळांचा विकास करणे, समुद्रकिनाऱ्या शेजारील क्षेत्रांचा विकास करणे, ऊर्जा क्षेत्रात अमुलाग्र बदल घडविणे, डिजिटल कनेक्टिव्हिटी कार्यक्रमाद्वारे भारतातील प्रत्येक गावात हायस्पीड ऑप्टिकल फायबर नेटवर्कशी जोडणे गरजेचे होते आणि ते अधिकांश स्वरूपात पूर्ण देखील केले.
- **स्वस्थ भारत :** स्वस्त भारत अभियानात सर्व भारतीयांना सुलभ आरोग्य सेवा प्रदान करणे ज्यामध्ये भारतातील गरीब कुटुंबांना ०५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार पुरविणे, त्याचप्रमाणे आरोग्य सेवा क्षेत्र मजबूत बनविणे, गर्भवती महिला आणि लहान मुलांचे लसीकरण आणि पोषण अभियान व्यापकपणे राबविणे, क्षयरोग निर्मूलन करणे यासारखे आरोग्य संबंधी महत्त्वाचे मुद्दे अंतर्भूत होते व यावर योग्य कार्यवाही देखील देल्याचे दिसते.
- **सुशासन :** भारतात सुशासनात सुधारणा करण्यासाठी राज्य विधानसभा आणि संसदेच्या निवडणुका एकाच वेळी घेऊन निवडणुकीमध्ये होणारा खर्च कमी करणे, भ्रष्टाचार मुक्त भारत निर्माण करणे, नागरी सेवा आणि शासन यामध्ये सुधारणा घडवून आणणे, पोलीस व्यवस्थेत सुधारणा घडवणे, न्यायालयीन सुधारणा घडवून आणणे, विज्ञान आणि तंत्रज्ञानात बदल घडविणे, जंगल आणि पर्यावरण सुरक्षित करणे, हिमालयातील क्षेत्रांचे संरक्षण करणे, भारतातील वेगवेगळ्या द्वीपसमूह क्षेत्रांचा विकास घडवून आणणे, केंद्रशासित प्रदेशांचा विकास घडवून आणणे, उत्तर-पूर्वेकडील राज्यांचा विकास घडविणे यामध्ये अपेक्षित होते. त्यानुसार भाजपाने पावले देखील उचललेले दिसून येतात.
- **युवा भारत :** भारतातील युवकांसाठी नवीन संधीमध्ये वाढ करणे म्हणजेच नवनवीन स्टार्टअप सुरू करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देणे, प्रशासनातील युवकांचा सहभाग वाढविणे, खेळामधील युवक-युवतींचा सहभाग वाढविणे अपेक्षित आहे आणि त्याअनुषंगाने बहुतांश प्रमाणात सुधारणा देखील दिसून येतात.
- **शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण :** प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे, कौशल्य विकास अधिक सक्षम करणे यासारखे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणलेले दिसून येतात.
- **महिला सशक्तिकरण :** महिला सशक्तीकरणात प्रामुख्याने महिलांना केंद्रस्थानी ठेवून विकास करणे, महिलांना समान अधिकार प्राप्त करून देणे, महिलांना आदरयुक्त जीवन प्रदान करणे, महिला आरक्षण देणे यासारखे घटक अंतर्भूत होते, त्याअनुषंगाने कायदे व धोरण देखील तयार केल्याचे दिसते.
- **सर्वसमावेशक विकास :** सर्वसमावेशक विकासात सर्वांसाठी न्याय, सर्वांचा विकास, गरिबांचे कल्याण, निम्न मध्यमवर्गाला प्राधान्य, भौगोलिक समानता, अल्पसंख्यांक वर्ग, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांना सक्षम बनविणे, श्रमिक वर्गाचे कल्याण, छोट्या दुकानदारांसाठी

पेन्शन योजना लागू करणे, कारागिरांचे कल्याण करणे, बालकल्याण घडवून आणणे तसेच तृतीयपंथीयांचे सशक्तीकरण करणे यामध्ये अंतर्भूत केले होते. त्यानुसार पावले उचललेले दिसून येतात.

- **सांस्कृतिक विकास :** यामध्ये प्रामुख्याने राम मंदिर पूर्णत्वास नेणे, भारतीय आस्था आणि संस्कृतीचे संरक्षण करणे, भारतीय भाषांचे संरक्षण करणे, नमामि गंगे उपक्रम व्यापक प्रमाणात राबविणे, शबरीमाला प्रकल्प राबविणे, योग या घटकाचा वैश्विक स्तरावर विकास करणे, सांस्कृतिक महोत्सव घडवून आणणे, समान नागरी कायदा लागू करणे यासारखे घटक अंतर्भूत होते तसेच या घटकांवर बहुतांशी काम देखील केलेले दिसते.
- **वैश्विक स्तरावरील भारत :** वैश्विक भारत निर्मितीमध्ये वसुधैव कुटुंबकम संकल्पना राबविणे, प्रवासी भारतीयांच्या नेहमी संपर्कात राहणे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आतंकवादाच्या विरोधात उभे राहणे, संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य होणे यासारखे घटक महत्त्वपूर्ण होते आणि ते पूर्ण करण्यात भारतीय जनता पार्टी बऱ्याच अंशी यशस्वी देखील ठरल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

भारतीय जनता पार्टीने सन २०१९ च्या १७ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत आपल्या जाहीरनाम्यात घोषित केलेल्या घटकांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याच्या अनुषंगाने खालील निष्कर्ष दिसून येतात :

- कृषी विकासात शेतकऱ्यांशी संबंधित अनेक योजना लागू झालेल्या दिसून येतात.
- युवक आणि त्यांचे शिक्षण या संदर्भात देखील अनेक सकारात्मक बदल पहावयास मिळतात.
- पायाभूत सुविधांमध्ये देखील अनेक सकारात्मक बदल घडून आलेले आहेत.
- आरोग्य सेवा क्षेत्रात अनेक योजनांद्वारे गरिबांना लाभ मिळत असल्याचे दिसते.
- भारताची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा अधिक सुदृढ झालेली दिसून येते.
- सुशासनासंदर्भात अनेक बदल केलेले दिसून येतात.
- महिला संदर्भात विविध कायदे आणि योजना अमलात आणून महिलांना आर्थिक स्वावलंबी केल्याचे दिसते.
- सांस्कृतिक दृष्ट्या भारताचे स्थान उंचावलेले राम मंदिराच्या मुद्द्यावरून आपणास दिसून येते.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ.सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोणी, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

२. गुप्ता शंतनू (अनु. मल्हार पांडे), भारतीय जनता पक्ष : काल, आज आणि उद्या, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, जानेवारी २०२१, पृ.क्र. ४१.

३. भारतीय जनता पार्टी, लोकसभा २०१९ सार्वत्रिक निवडणूक जाहीरनामा.

४. दैनिक लोकसत्ता, दिव्य मराठी, लोकमत, द हिंदू.

५. मासिक लोकराज्य.